४

# गीतेतील मुख्य विचार

**डॉ.शिरीष लिमये**
सिंबायोसिस कला आणि वाणिज्य महाविद्यालय
सेनापती बापट रस्ता, पुणे

## १ . गीतेचे महात्म्य

### श्रीमद्भगवद्गीता : भारताचे सांस्कृतीचे प्रतिक

स्वामी विवेकानंद आणि संस्कृत भाषेचा अभ्यास करणारे जर्मन देशातील तज्ञ श्री . मॅक्समूलर यांची लंडनमध्ये भेट झाली होती . त्षा भेटीचे रुपांतरण पुढे त्यांच्या गाढ मैत्रीमध्ये झाले . जेव्हा स्वामी विवेकानंद जर्मनीहून भारतात जायला निघाले तेव्हा स्वामीजींनी श्री . मॅक्समूलर यांना विचारले, "भेट म्हणून मी तुमच्यासाठी भारतातून कोणती वस्तू पाठवू?" यावर श्री . मॅक्समूलर स्वामीजींना म्हणाले, "स्वामीजी आपण भारतात परत गेल्यानंतर भारताचे वैशिष्टय असेल, सांस्कृतिक प्रतिक आणि प्रतिनिधी असेल अशी भेट मला पाठवा ." भारतात परत आल्यानंतर स्वामीजींनी आठवणीने श्री . मॅक्समूलरांना ती भेट पाठविली . ती भेट कोणती होती? "गीता . . . . . श्रीमद्भगवद्गीता"

श्रीमद्भगवद्गीतेचं महत्त्व ब्रिटिशांनी ओळखलेलं होतं . म्हणूनच श्री . वॉरन हेस्टिंग्ज यांनी श्री . चार्लस्विल्किन्स यांना पगारी रजा देऊन काशीच्या एका पंडितांकडे संस्कृत शिकायला पाठविले, गीतेचा इंग्रजी अनुवाद करायला सांगितला आणि ३० मे, १७८५ रोजी कोर्ट ऑफ डायरेक्टर्सच्या परवानगीने तो अनुवाद प्रसिध्द केला . त्याच्या प्रस्तावनेत श्री . वॉरन हेस्टिंग्ज म्हणतात, 'हिंदूस्थानामुळे लाभलेली संपत्ती आणि सत्ता स्मृतिशेष होऊन इंग्रजांचे हिंदूस्थानावरील अधिपत्य नष्ट झाल्यावरही हिंदू तत्वज्ञानांची नावे चिरकाल टिकून राहतील'त्यानंतरच्या काळात सर एडविन्अरनॉल्ड हे भारतात आले, पुण्यात राहिले आणि त्यांनी संस्कृत भाषेचा अभ्यास केला आणि भगवद्गीतेवर त्यांनी लिहिलेले 'द सॉग ऑफ द सेलेस्टिअल' एक पुस्तक लिहिले .

कदाचित ग्रंथ छपाईच्या बाबतीत जगात 'बायबल'या ग्रंथाचा पहिला क्रमांक लागेल आणि गीता दुसऱ्या क्रमांकावर असेल . श्रीमद्भगवद्गीतेवरच्या प्रेमामुळे त्याच्या अनेक प्रती आज जगात छापल्या जात आहेत, असे आपल्या निदर्शनास येईल .

### भारतीय उदाहरणे

भारतातील अनेक असामान्य व्यक्तिमत्त्वाच्या लोकांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत श्रीमद्भगवद्गीतेचा अत्यंत उपयोग झाला होता . त्यांना गीतेतील बहुमोल विचार सतत मार्गदर्शक ठरलेले होते असे आपल्याला आढळून येईल . १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात मंगल पांडे, तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मीबाई,

श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्यासारख्या अनेक राजांच्या मनाला सतत स्फूर्ती देत राहिलेले गीतेतील श्लोक होते :

(संस्कृत ओव्यांचा अर्थ सुलभ होण्यासाठी सोबत विनोबांच्या गीताईतील समश्लोक दिलेला आहे .)

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते |
क्षुद्रं हृदय दौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप || २ . ३||

(निर्वीर्य तू नको होऊन शोभे हे मुळी तुज | भिकार दुबळी वृत्ती सोडुनी ऊठ तू कसा ||)

क्षअवाच्यवादांश्च्व बहून्वदिष्यन्ति तवाहिताः |
निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम्|| २ . ३६||

(बोलतील तुझे शत्रु भलते भलते बहु | निंदतील तुझे शौर्य काय त्याहूनि दुःखद ||)

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्षसे महीम |
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृ तनिश्च्चयः||२ . ३७||

(मेल्याने भोगसी स्वर्ग जिंकिल्याने माही-तळ | म्हणूनि अर्जुना ऊठ युद्धास दृढ-निश्चये ||)

संत ज्ञानेश्वर माऊलींनी तर वयाच्या पंधराव्या वर्षीच गीतेवर भाष्य केले होते . इतकेच नव्हे तर समर्थ रामदास स्वामी, गोंदवलेकर महाराज, स्वामी विवेकानंद, पावसचे स्वामी स्वरूपानंद सर्वांनीच गीतेचा तरूण वयात अभ्यास केला होता . लोकमान्य टिळकांनी तर वयाच्या १६ वर्षी श्रीमद्‌भगवद्‌गीता वाचली होती . मंडालेच्या तुरुंगात असताना त्यावर ग्रंथ 'गीता रहस्य' हा ग्रंथही लिहिला होता हे आपल्याला ठाऊक असेलच .

**गीता महात्म्य**

जर एखाद्या वस्तूंच महत्त्व आपल्याला समजंल नाही तर आपण ती वस्तू कवडीमोल म्हणून वापरतो . एका सुभाषितकारानं म्हटलं आहे . मलये भिल्लपुरंध्रि चंदनतरूकाष्ठं इंधनं कुरूते || म्हणून कोणत्याही गोष्टीचं महत्त्व जाणून घेणं महत्त्वाचं असतं . आता आपण भगवद्‌गीतेचं महात्म्य जाणून घेऊया . भारतात आध्यात्मिक क्षेत्रात गीता हा सर्वात प्रसिध्द ग्रंथ आहे . गीता ही जणू सर्वांची आई आहे . आनंदी असलेल्यांना, दुःखी असलेल्यांना, मनाने खचलेल्यांना सर्वांनाच ती मातृप्रेमाने जवळ करते . श्रीमद्‌भगवद्‌गीचे महात्म्य सांगणारा एक श्लोक प्रसिद्ध आहे . तो असा

'सर्वोपनिषदो गावो | दोग्धा गोपालनंदनः |
पार्थोवत्सः सुधीर्भोक्ता | दुग्धं गीतामृतं महत्||'

सर्व उपनिषद जणू गाई झालेल्या आहेत . त्या गाईचे दोहन करणारे आहेत भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन जणू काही त्या दुग्धरुपी अमृताचे पान करणारा आहे . याचा अर्थ असा की सर्व उपनिषदांतील सार या एका भगवद्‌गीतेत सांगितलेले आहे . म्हणून अनेकानेक ग्रंथ वाचण्याची धडपड सोडून हा एका ग्रंथातील शिकवणी



Vol: 4th, Issue : III, English-Marathi, Quarterly: 1st Dec. 2015,ISSN : 2319-5525

जरी आपण आपल्या जीवनाचा भाग बनवली तरी आपले जीवन सार्थक होईल . पण यासाठी आवश्यक आहे तो आपला या ग्रंथाकडे पाहण्याचा दुष्टिकोन बदलण्याची . ती गीता त्या कृष्णाने त्या अर्जुनाला सांगितली असा आपला दृष्टिकोन नसावा . ही गीता माझ्या प्रिय भगवान श्रीकृष्णाने मला अत्यंत प्रेमाने सांगितली आहे . असा दृष्टिकोन ठेवावा . म्हणजे आपल्याला गीतेतील शिकवणी आपल्या जीवनात उतरविण्यास खऱ्या अर्थाने मदत होईल . अन्यथा गीतेचा अभ्यास ही केवळ एक बौद्धिक कसरतच राहील . त्यातून माझ्या जीवनाचा दर्जा उंचावला पाहिजे अशी वृत्ती निर्माण होणार नाही .

श्रीमद्‌भगवद्‌गीता इतकी महत्त्वपूर्ण आणि प्रसिध्द का आहे ?

१ . भारतील अध्यात्म शास्त्रात समस्त जगातील मानव जातीच्या उद्धाराचे तीन मार्ग सांगितलेले आहेत . त्यांना प्रस्थान त्रयी म्हणतात . त्यात ब्रह्मसूत्रं, उपनिषदं आणि गीता तीन ग्रंथांचा समावेश होतो . गीता हा प्रस्थान त्रयीपैकी असा एक मौलिक ग्रंथ आहे की जो सार्वजनीन आहे . सर्वासाठी आहे .

गीतेत म्हटलं आहे

यत: प्रवृत्ति: भूतानां येन सर्वमिदं ततम्|
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिध्दीं विंदति मानवा: ||१८ . ४६||

(जो प्रेरी भूतमात्रास ज्याचा विस्तार विश्व हे | स्व कर्म-कुसुमी त्यास पूजितां मोक्ष लाभती ||)

या ठिकाणी भगवंतांनी 'हिंदवा:' असा शब्द वापरलेला नाही . याचा अर्थ श्रीमद्‌भगवद्‌गीता ही कोणत्याही विशिष्ट जाती, धर्म, वंश, देशाच्यासाठी सांगितली गेलेली नाही तर ती अवघ्या मानव जातीच्या उद्धाराचा मार्ग सांगण्यासाठी सांगितलेली आहे . व्यवहारात राहून परमात्म्याची प्राप्ती कशी करायची याची कला गीतेत शिकविलेली आहे .

२ . श्रीमद्‌भगवद्‌गीता हा हिंदू धर्मात पाचवा वेद मानला गेला आहे आणि त्याला ऋग्वेद, यर्जुवेद, अथर्ववेद, सामवेद या चार वेदांच्या सारखेच महत्त्वाचे स्थान आहे . गीता वेदांइतकीच महत्त्वाची आहे .

३ . गीता ही जरी महर्षी वेदव्यासांनी संग्रहीत केलेली असली तरी ती साक्षात भगवंताची वाणी आहे हे आपण विसता कामा नये . भागवतात ज्या ज्या ठिकाणी श्रीकृष्णांनी उद्‌बोधन केलेले आहे त्या त्या ठिकाणी 'श्रीकृष्ण उवाच' असं म्हटले गेलेलं आहे . पण गीतेत मात्र ज्या ज्या ठिकाणी श्रीकृष्ण बोललेले आहेत त्या त्या ठिकाणी 'भगवान उवाच' असं म्हटलेलं आहे . यावरून गीतेत अर्जुनाला मार्गदर्शन करताना किती उच्च भाव धारण करत आहेत ते दिसून येते .

४ . गीता संसाराच्या मोहाच्या नाशासाठी सांगितली गेली . श्रीमद्‌भगवद्‌गीता प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात आहे . अर्जुनासारखा शिष्य श्रीकृष्णासारख्या गुरूला काही प्रश्न विचारतो आहे . अर्जुनाच्या स्वजनांविषयीचा मोह नष्ट होऊन त्याच्या इतर सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन झाल्यानंतर अर्जुन भगवंताला म्हणतो आहे,

नष्टो मोह: स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत |
स्थितोऽस्मि गतसन्देह: करिष्ये वचनं तव |

(मोह मेला चि तो देवा कृपेने स्मृति लाभली | झालो नि:शंक मी आता करीन म्हणसी तसे ||)



Vol: 4th, Issue : III, English-Marathi, Quarterly: 1st Dec. 2015,ISSN : 2319-5525

५.    गीतेतील अनेक वचने आजही लागू आहेत कोणत्याही सांप्रदायाच्या, जातीच्या , धर्माच्या, वंशाच्या, देशाच्या माणसाला ही वचने लागू पडतात. उदाहरणार्थ, माणसाला अति राग आल्यानंतर त्याचा विविक कसा नष्ट होतो आणि त्याची कशी धुळधाण उडते ते जे गीतेत सांगितलेले आहे ते त्यावेळेला जितके लागू होते तितकेच आजही आपल्या सर्वांनाच लागू आहे. तसेच ते जितके भारतीय माणसाला लागू आहे तितकेच ते पदेशातील माणसालाही लागू नाही.

भगवान म्हणतात,

क्रोधात्भवति संमोह: संम्मोहात्स्मृतिविभ्रम:|
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ||२.६३||

(क्रोधातुनि जडे मोह मोहाने स्मृति लोपली | स्मृति-लोपे बुद्धिनाश म्हणजे आत्मनाशचि ||)
रागाच्या भरात कोण माणूस काय कृत्य करून बसेल याचा काहीही नेम नाही. म्हणून गीता आपल्याला क्रोधाचे काय परिणाम होतात ते सांगून, आपल्या क्रोधावर आपल्याला नियंत्रण ठेवावला सांगत आहे.

६.    व्यवहारात राहून परमात्मा प्राप्तीची कला गीतेत सांगितली आहे. प्रत्येक माणसाच्या अंगी तीन प्रकारच्या शक्ती कार्यरत असतात. कार्यशक्ती, जाणण्याची शक्ती आणि विश्वास ठेवण्याची शक्ती. यातील कार्य शक्तीचा योग्य उपयोग करून परमात्मा कसा प्राप्त करून घेता येईल ते गीतेने कर्मयोगात सांगितले आहे. जाणण्याची शक्ती वापरून परमात्मा कसा प्राप्त करून घेता येईल ते गीतीने ज्ञानयोगात सांगितले आहे आणि विश्वास ठेवण्याची शक्ती वापरून परमात्मा कसा प्राप्त करून घेता येईल ते गीतीने भक्तीयोगात सांगितले आहे.

**सारांश काय ?**

शिक्षणाची व्याख्या करताना स्वामी विवेकानंद म्हणतात की मन, मनगट, मेंदू यांच्या संतुलित विकासला मी शिक्षण असे म्हणतो. याचा अर्थ मन शांत असावं, शरीर सुदृढ असावं आणि मेंदू तल्लख असावा अशी त्यांची अपेक्षा आहे.  मन शुद्ध आणि पवित्र करण्यासाठी गीतेच्या अभ्यासाची प्रत्येकालाच गरज आहे.  गीता वाचन हे मनाला स्नान आहे. स्नान हे नियमित करायचे असते. सुट्टी घेऊन चालत नाही. तसेच गीताभ्यास नियमीत करायचा असतो. त्यातही सुट्टी घेऊन चालत नाही. There is no holiday in spirituality. म्हणून गीतेतील एक तरी श्लोक नियमीत वाचण्याचा, त्यावर मनन करण्याचा , ते श्लोक समजून घेण्याचा आणि त्या श्लोकाचे मर्म आपल्या जीवनात उतरवून आपल्या जीवनाचा दर्जा उंचविण्याचा आपण आजच संकल्प करु या.

**संदर्भ :**

१. मानवसाधक संजीवनी - आचार्य रामसुखदास महाराज, गीता प्रेस, गोरखपूर
२. गीता तत्त्वचिंतन - स्वामी आत्मानंद महाराज, रामकृष्ण मठ, अद्वैताश्रम, मायावती, हिमालय
३. गीतेतील मुख्य विचार - श्री. ग. श्री. खैर, पुणे विद्यार्थी गृह, प्रकाशन, पुणे.
४. भगवद्गीता का सार्वजनीन संदेश - स्वामी रंगनाथानंद महाराज, रामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर

...